बा · वा
२४२

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा-वा
दा. क्र. २४२

BVBK-0400242

बा. वा.
नों. क्र. २४२

# लंबू आणि बुटक्या

म. पं. भ. ठाणे, वाचनालय संस्था.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २४२ दिनांक ....
विषय किशोर क्र. २२९



BVBK-0400242



कुमारांसाठी
मनोरंजक
कादंबरिका

# लंबू
# आणि
# बुटक्या

उद्धव
ज.
शेळके

सरस
साहित्य
पुणे ९

प्रकाशक :
एस. सुनिल
सारस साहित्य
अरविन्द निवास कात्रज : पुणे ४११००९

© उद्धव ज. शेळके

मुखपृष्ठ-सजावट :
रमेश भारताल

मूल्य :
चार रुपये

आवृत्ती पहिली
जानेवारी १९७९

मुद्रक :
ग. शं. परभाणे
अनमोल मुद्रणालय
३८३ ब, शनिवार पेठ
पुणे ४११०३०

दिनांक ......
२४२
विषय किशोर क. २२९

# लंबू आणि बुटक्या

एक होता राजा. त्याला एक मुलगा होता. राजा म्हातारा झाला होता. राजपुत्र तरुण होता. राजा राजपुत्राच्या लग्नाची विवंचना करीत असे. राजपुत्राला सदासर्वदा लग्नाचा आग्रह करीत असे.

प्रथम ही बाब राजपुत्र मनावरच घेत नसे. पण एके दिवशी राजाचा अतिशय आग्रह पाहून राजपुत्र म्हणाला, " महाराज, आपण म्हणताच आहात त्याप्रमाणं मी लग्न करीनही. परंतु मला आवडणारी मुलगी मिळायला हवी. त्याखेरीज मी लग्नाला तयार होणार नाही. "

राजा म्हणाला, " मी तरी कुठं तुला न आवडत्या मुलीशी लग्न कर म्हणतोय ? पण आवडणारी मुलगी म्हणजे काय ?"

राजपुत्राला नेमकं हे सांगता आलं नाही. तो म्हणाला, " ते मी मुलगी पाहिल्यावर ठरवीन. "

" तर मग मुली तरी पाहिल्या आहे काय ?"

" नाही. " राजकुमार म्हणाला, " अजून तसा योग आला नाही. "

" पाहायच्या तरी आहेत काय ?"

" होय. " राजकुमार तयार झाला.

राजानं त्याला एक सोन्याची चावी दिली. सांगितलं, " आपल्या महालावर मनोरे आहेत. सर्वांत उंचावरच्या मनोऱ्यावर जा. तिथं बंदिस्त खोली आहे. खोलीत तुला हव्या तशा मुली बघता येतील. "

राजकुमार खूष झाला. चावी घेतली. ठरल्या दिवशी, ठरलेल्या वेळी मनोऱ्याच्या पायऱ्या चढू लागला. मनोरा दगडी बांधणीचा होता. पायऱ्या शिडीसारख्या होत्या. लोखंडी, अरुंद मनोऱ्यासारख्याच पायऱ्याही पुढं निमुळत्या होत गेल्या होत्या. राजकुमार एकेका ढेंगेत चार-चार पायऱ्या चढे. उंचच उंच जाई. थकत होता. तेव्हा खिडक्यातून बाहेर बघत होता.

बाहेर किती सुंदर दिसत होतं ! तो मनोऱ्याच्या दुसऱ्या खिडकीतून पाहात असता खालची माणसं हातभर उंचीची दिसत होती. चवथ्या खिडकीत घरं खेळातल्या घरकुलांसारखी दिसत होती. आठव्या खिडकीतून झाडं करंगळी एवढी दिसत होती. बाराव्या खिडकीतून डोंगर चिमुकल्या टेकाडासारखे दिसत होते. सोळाव्या खिडकीतून झाडं नि डोंगर यांतली तफावत ओळखू येईनाशी झाली होती. राजकुमाराला सारं कसं विस्मयजनक वाटत होतं. मनोरा इतका उंच असेल याची त्याला अद्याप कल्पना नव्हती. ती यापूर्वी राजकुमार कधी मनोऱ्यावर चढला नाही म्हणून की आता तो त्यावर चढत असताना मनोरा उंचच उंच वाढत होता म्हणून ?

राजकुमार शेवटच्या मजल्यावर आला. तो किती उंचावर होता ? शंभरावा मजला होता की एकशे पन्नासावा ? राजकुमार मध्येच मजले मोजणं विसरला होता. कधी एकोणपन्नासच्या

ऐवजी एकोणचाळीस होई. कधी एकोणसाठ !

राजकुमारानं मजले मोजण्याचा नादच सोडला होता. पुन्हा मोजायचे म्हणजे कोण आफत !

शेवटल्या मनोऱ्यावर अरुंद खोली होती. तिला खिडकीएवढं दार होतं. चांदीचं कुलूप होतं. राजकुमारानं सोन्याच्या किल्लीनं कुलूप उघडलं. दार काढलं. आत डोळे दिपवणारा लखलखाट होता. पहिल्यांदा राजकुमाराला वाटलं तो सूर्यप्रकाशच असावा. त्यानं डोळे चोळले. किलकिले केले. पाहिलं. तो सूर्यप्रकाश नव्हता. आत असंख्य आरशे होते. ते एकमेकांत परावर्तीत होत होते. प्रतिबिंबीत होत होते. परावर्तनं शतगुणित होत होती. तसा प्रकाशसुद्धा शतगुणित होत होता.

राजकुमार आत शिरला. त्यानं बारकाईनं पाहिलं. प्रथम वाटलं होतं आपण आत पाऊल टाकल्याबरोबर जिकडे तिकडे आपली प्रतिबिंबं पडतील. तसं झालं नाही. कांचांत सुंदर मुलींची प्रतिबिंबं होती. प्रत्येक काचेत वेगळी मुलगी. वेषभूषेवरून सर्व मुली



" होय." राजकुमार तयार झाला.

राजानं त्याला एक सोन्याची चावी दिली. सांगितलं, " आपल्या महालावर मनोरे आहेत. सर्वांत उंचावरच्या मनोऱ्यावर जा. तिथं बंदिस्त खोली आहे. खोलीत तुला हव्या तशा मुली बघता येतील. "

राजकुमार खूष झाला. चावी घेतली. ठरल्या दिवशी, ठरलेल्या वेळी मनोऱ्याच्या पायऱ्या चढू लागला. मनोरा दगडी बांधणीचा होता. पायऱ्या शिडीसारख्या होत्या. लोखंडी, अरुंद मनोऱ्यासारख्याच पायऱ्याही पुढं निमुळत्या होत गेल्या होत्या. राजकुमार एकेका ढंगेत चार–चार पायऱ्या चढे. उंचच उंच जाई. थकत होता. तेव्हा खिडक्यातून बाहेर बघत होता.

बाहेर किती सुंदर दिसत होतं ! तो मनोऱ्याच्या दुसऱ्या खिडकीतून पाहात असता खालची माणसं हातभर उंचीची दिसत होती. चवथ्या खिडकीत घरं खेळातल्या घरकुलांसारखी दिसत होती. आठव्या खिडकीतून झाडं करंगळी एवढी दिसत होती. बाराव्या खिडकीतून डोंगर चिमुकल्या टेकाडासारखे दिसत होते. सोळाव्या खिडकीतून झाडं नि डोंगर यांतली तफावत ओळखू येईनाशी झाली होती. राजकुमाराला सारं कसं विस्मयजनक वाटत होतं. मनोरा इतका उंच असेल याची त्याला अद्याप कल्पना नव्हती. ती यापूर्वी राजकुमार कधी मनोऱ्यावर चढला नाही म्हणून की आता तो त्यावर चढत असताना मनोरा उंचच उंच वाढत होता म्हणून ?

राजकुमार शेवटच्या मजल्यावर आला. तो किती उंचावर होता ? शंभरावा मजला होता की एकशे पन्नासावा ? राजकुमार मध्येच मजले मोजणं विसरला होता. कधी एकोणपन्नासच्या

ऐवजी एकोणचाळीस होई. कधी एकोणसाठ !

राजकुमारानं मजले मोजण्याचा नादच सोडला होता. पुन्हा मोजायचे म्हणजे कोण आफत !

शेवटल्या मनोऱ्यावर अरुंद खोली होती. तिला खिडकीएवढं दार होतं. चांदीचं कुलूप होतं. राजकुमारानं सोन्याच्या किल्लीनं कुलूप उघडलं. दार काढलं. आत डोळे दिपवणारा लखलखाट होता. पहिल्यांदा राजकुमाराला वाटलं तो सूर्यप्रकाशच असावा. त्यानं डोळे चोळले. किलकिले केले. पाहिलं. तो सूर्यप्रकाश नव्हता. आत असंख्य आरशे होते. ते एकमेकांत परावर्तीत होत होते. प्रतिबिंबीत होत होते. परावर्तनं शतगुणित होत होती. तसा प्रकाशसुद्धा शतगुणित होत होता.

राजकुमार आत शिरला. त्यानं बारकाईनं पाहिलं. प्रथम वाटलं होतं आपण आत पाऊल टाकल्याबरोबर जिकडे तिकडे आपली प्रतिबिंबं पडतील. तसं झालं नाही. कांचांत सुंदर मुलींची प्रतिबिंबं होती. प्रत्येक काचेत वेगळी मुलगी. वेषभूषेवरून सर्व मुली



राजघराण्यातील दिसत होत्या. एकीपेक्षा दुसरी सुंदर होती. जणू त्यांच्यात लावण्याची स्पर्धाच लागली होती.

राजकुमार बारकाईनं पाहात होता. बहुतेक मुली हसत होत्या. प्रसन्न होत्या. आनंदित होत्या. पाहाता पाहाता राजकुमारच्या लक्षात आलं; एक मुलगी दुःखी होती, कष्टी होती. अप्रसन्न होती. तिच्या डोळ्यांत आसवं होती. कपाळावर तळवे ठेऊन ती रडत होती. राजकुमाराला याच मुलीविषयी कणव आली. दया वाटली. त्याच्या अंतःकरणात सहानुभूती, आस्था नि प्रेम जागं झालं. किंचितसा तो पण कष्टी झाला. त्यानं विचार केला; काय वाटेल ते झालं तरी आपण याच मुलीशी लग्न करावं. त्यानं मुलीचा क्रमांक लक्षात ठेवला. कारण खोलीतील प्रत्येक काचेवर मुलींचे क्रमांक दिले होते.

राजकुमार निश्चयानं खोलीबाहेर पडला. दार लावलं. कुलूप घातलं. भराभर पायऱ्या उतरू लागला. चढताना त्यानं उतरताना मजले मोजायचं ठरवलं होतं. परंतु आता मुलीचा क्रमांक विसरून जाऊ या भयानं मजले मोजले नाहीत. त्यांची काय गरज होती ?

राजकुमार राजाकडे आला. म्हणाला, " महाराज, मी एक मुलगी निवडली आहे."

राजा प्रसन्न झाला. मुलाला मुलगी पसंत पडणं म्हणजे बापानं प्रसन्न होऊ नये तर काय ? राजानं आतुरतेनं विचारलं, " कुठली ? कुठल्या क्रमांकाची ?"

" आठव्या क्रमांकाची."

" काय, म्हणतोस काय ! मूर्खा, त्या रडक्या मुलीत तुला विशेष काय दिसलं ?" राजा संतापला. त्याच्या चेहऱ्यावर भय होतं.

“ ते मला सांगता यायचं नाही.” राजकुमार ठामपणे म्हणाला, “ पण मी लग्न करेन तर याच मुलीशी. नाही तर नाही.” राजकुमार ठामपणे म्हणाला.

“ काहीतरी बरळू नकोस. ती रडकी मुलगी म्हणजे एक भयानक संकट आहे. एका क्रूर, निष्ठूर आणि समर्थ चेटक्यानं तिला आपल्या तावडीत ठेवलं आहे.”

“ असू द्या महाराज. मी तिची सुटका करेन. सोडवेन मी तिला–”

“ मूर्खपणा करू नकोस.” राजा गरजला, “ तिला सोडविण्या-पायी जिथं मोठमोठे राजे, राजपुत्र जेरीस आले व नष्ट झाले; तिथं तुझ्यासारख्या मुलानं असं काही बोलणं पोरकटपणाच नाही काय ?”

“ ते काहीही असो महाराज. मी तिची सुटका करण्याचा निश्चय केला आहे. तिला वचन दिलं आहे. मला ते पाळलं पाहिजे.”

“ ती तुझ्याशी बोलली ?”

“ नाही महाराज. मी स्वतःहून निश्चय केला आहे. वचन दिलं आहे.”

“ म्हणजे हे सारं एकतर्फीच ना ? ” राजा चेष्टेनं म्हणाला, “ एकतर्फी वचनाला आणि प्रेमाला जगात अर्थ नसतो. माझं ऐक. त्या मुलीसाठी तू आपत्ती ओढवून घेऊ नकोस.”

“ पण, मी निश्चय केला आहे महाराज !” राजकुमार हट्टाला पेटला, “ निश्चय ढळू देणं चांगलं नसतं.”

“ खड्डयात जा !” महाराज संतापानं थरथरलाच, “ उद्या आपत्तीच्या जाळयात सापडला म्हणजे मी काय बोलतोय ते

कळेल. त्याशिवाय तू ऐकायचा नाहीस." राजानं राजपुत्राचा नाद सोडला.

राजपुत्राचा निश्चय कायम होता. त्याच्या अंतःकरणात आठव्या क्रमांकाची मुलगी आपल्या अश्रूंनी सतत ओल निर्माण करीत होती. राजकुमार दयेनं पाझरत होता.

☘ ☘

## २. लंबू झाडासारखा लांब व जाड झाला

त्या रात्री राजपुत्राला झोप लागली नाही. तो पहाट होण्याची वाट पाहू लागला. जेमतेम झुंजुमुंजू होतं न होतं तर तो महालाच्या बाहेर पडला. पागेतून एक उमदा घोडा घेतला. राजद्वारावरून घोड्यानं राजरस्त्यावर उडी मारली. कारण महाद्वार बंद होतं. पहारेकऱ्यांनी राजपुत्राला अशा अवेळी नि तेही एकट्यानं बाहेर पडू दिलं नसतं.

राजपुत्र भरधाव घोडा दवडतच होता. सकाळ झाली. दुपार झाली. संध्याकाळ नि मग रात्र. परंतु राजपुत्र अविश्रांतपणे घोडा पळवत होता. मागं पाहात नव्हता, पुढं पाहात नव्हता की तहानभुकेची तमा ठेवीत नव्हता.

मध्यरात्रीच्या सुमारास राजपुत्र एका अरण्यापाशी आला. अरण्य भयानक होतं. रातकिडे, टिटव्या, पाकोळ्या यांच्या आवाजानं अंगाचा थरकाप उडत होता. लांब दूरवर वाघोबा डरकाळ्या फोडत होते. जंगल दणाणत होतं. झाडांची दाटी इतकी होती, की राजपुत्राला पुढं पाऊल टाकणं शक्य होत नव्हतं.

निश्चयी राजपुत्र निर्भय होता. तो वाट हुडकत होता. कधी डावीकडे मैल दोन मैल जायचा, तर कधी तितकंच उजवीकडे जाऊन वाट शोधण्याचा प्रयत्न करायचा; पण काही केल्या काही जमायचं नाही. निश्चय करून एखाद्या झुडुपात घोडा घालण्याचा प्रयत्न केला तर घोडाच जायचा नाही. राजकुमार कंटाळला. विचार केला : दिवस उगवू द्यावा, मग वाट दिसेल. नंतर पुढं जाऊ. शिवाय तो दमला होता. भुकेला होता. त्याला झोप आली होती.

निश्चय झाला. राजकुमारानं घोड्याला एका झाडाखाली आणलं. प्रथम त्याला बांधून ठेवण्याचा राजकुमाराचा विचार होता. मग शंका आली. जंगली श्वापदांनी हल्ला केला तर बांधलेल्या घोड्याला पळता येणार नाही. प्रतिकार करता येणार नाही. बिचारा अगतिकपणे मरून पडेल. त्यापेक्षा मोकळाच ठेवावा. राहिला तर राहिला, गेला तर जाईल. आपल्या सोयीसाठी आपण त्याच्या प्राणाशी कशाला खेळावं ? राजकुमारानं घोडा मोकळाच ठेवला. स्वतः झाडावर चढला. तीन फाट्यांची फांदी पाहिली. पाला तोडला. फाट्यांच्या खोबणीत कोंबला. आजूबाजूच्या दोन फाट्यांवर, खुर्चीवर ठेवतात तसे हात ठेवले. पाय खाली सोडले. राजकुमार झोपला. क्षणात घोरू पण लागला.

कितीक क्षण गेले कुणास माहीत; राजपुत्राला जाग आली. पाहातो तो कुणीतरी त्याला हलवून जागं करीत होता. हलवणारा पुरुष होता. त्याचं डोकं झाडावरील राजकुमाराच्या डोक्याइतकं उंच होतं. पाय मात्र जमिनीवरच होते. हात लांबीरुंदीला साजेसे होते.

राजपुत्र घाबरला. त्यानं तलवार काढली. तो खडसावून म्हणाला, "तू कोण आहेस ?"

तो विचित्र पुरुषसुद्धा घाबरला. एका ढेंगेत बारा-एक फूट बाजूला झाला. राजकुमाराची तलवार तितकी लांब नव्हती. विचित्र पुरुष निर्धास्त होता. परंतु नम्रपणे बोलत होता, असं संतापू नका पाहुणेबुवा. मी तुमच्या साहाय्याला आलो आहे. हे अरण्य भयानक आहे. जंगली श्वापदांचा उपद्रव इथं फार होतो. तुम्ही इथं असं एकटचानं झोपू नये."

राजकुमाराचा विश्वास बसू लागला. पण विचारलं, "तू आहेस तरी कोण ?"

"लवचिक माणूस."

"म्हणजे ?"

"मला हवं तसं लहान-मोठं लांब-रुंद जाड-आखूड होता येतं."

"आणि तरीही तू माणूस आहेस ?"

"होय."

"माझा विश्वास नाही बसत." राजकुमार शंकेनं म्हणाला, "मला तू आधी सामान्य माणसाएवढं होऊन दाखव."

"ठीक नाहे." लवचिक माणूस कबूल झाला. त्याप्रमाणं करून दाखवू लागला. पाहाता पाहाता तो राजपुत्राएवढा झाला. यावेळी त्याचं डोकं राजपुत्र होता, त्या "झाडाच्या पारंब्यांनासुद्धा टेकत नव्हतं. मघाशी हे डोकं किती उंचीवर होतं ?

राजपुत्रानं हा प्रकार चमत्कारिकपणे पाहिला. त्याचं भय अजून निघालं नव्हतं. त्यानं विचारलं, "तुझं नाव काय ?"

"लंबू." तो माणूस मघासारखाच झाडाइतका लांब-जाड

होत म्हणाला, " माझ्यावर विश्वास ठेव. तुमच्यासारख्या नाजूक मुलानं अशा जंगलात राहू नये."

" मग काय करावं ? कुठं रहावं ? इथली मला काही माहिती नाही."

" माझी तर ओळख झाली ना ? मग चला माझ्याबरोबर. थोड्या अंतरावर माझं घर आहे. रात्रभर तिथं रहा. सकाळी न्याहारी करा. दिवसा उजाडी वाटेनं लागा. "

राजकुमाराला भूक लागली होती. झोप होती. थकवा होता. शिवाय लंबू एकदम विश्वासघातकी वाटत नव्हता. त्यात त्याचा विश्वास पडताळून पाहायला साधन नव्हतं. कारण नव्हतं. राजकुमारानं चारीकडं पाहिलं. खाली घोडा नव्हता. त्यानं लंबूला विचारलं, " माझा घोडा कुठं आहे ? "

" तुमचा घोडा मला पाहून भिऊन पळाला. मी त्याला धरण्याचा प्रयत्न केला. पण तो अंधारामुळं दिसला नाही. आपण त्याला सकाळी शोधून काढू या. " लंबू माणुसकीनं बोलत होता.

" सकाळी ? " राजकुमार संशयीच होता, " एवढ्या मोठ्या जंगलात माझा घोडा सापडणं कसं शक्य आहे ?"

"बरोबर सापडेल. माझा एक मित्र आहे तो अंतरज्ञानी आहे. बसल्या जागेहून कोणती वस्तू कुठं असेल, ते तो सांगू शकतो. त्यानं आपल्या घोड्याबद्दल सांगितलं की मी तो पकडून आणीन. मग तर झालं ना ?"

राजकुमार संमत झाला. तो त्या माणसाविषयीचं त्याचं भय निवळलं म्हणून नव्हे, तर तो माणूस आणि त्याचा अंतरज्ञानी मित्र आपल्या कामात मदतभूत होतील या अपेक्षेनं. पण म्हणालाच, " तुझं घर नेमकं कुठं आहे ते मला माहीत नाही.

एवढ्या कीर्रर्र जंगलात मला पायी चालणं शक्य नाही. मी राजघराण्यातला माणूस आहे. राजपुत्र आहे. नाजुक आहे."

"वाटलंच." आदरानं हसत लंबू म्हणाला, "आपल्या बोलण्यावरून मला हे आधीच वाटलं होतं. आपल्याला पायी चालण्याची गरज नाही." बोलता बोलता लंबूनं राजपुत्र होता त्या फांदीला आपला खांदा लावला. म्हटलं, "बसा महाराज. मी आपल्याला माझ्या घरी घेऊन जातो."

राजपुत्र लंबूच्या खांद्यावर बसला. एक पाय पाठीवर टाकला व दुसरा छातीवर. लगाम धरतात तसे डोकीचे केस हातात धरून ठेवले.

लंबू पन्नास पन्नास फुटांच्या ढेंगा टाकीत एका पायवाटेनं चालत होता. वर झाडं, वेली येत. काट्या दिसत. क्वचित् कधी फांद्यावर साप लोंबकळत असत. अजगर माणसांचा वास लागून जबडे वासत. राजकुमाराचा थरकाप होई. एखादा अजगर आपल्याला वरचेवर उचलून गिळंकृत करील असं वाटे. परंतु तसं होत नसे. झाड फार उंच असलं तर लंबू अतिशय बुटका होत असे आणि झाड बसकं असलं तर अतिशय उंच होत असे. ढेंगेनं झाड ओलांडून लंबू जात असे. बाभळीसारखी बसकी झाडं तर सहज ओलांडीत असे. अशावेळी झाडं–झुडुपं नि साप–अजगरांच्या तावडीतून वाचल्याचा राजपुत्राला एकीकडे आनंद होत असला तरी दुसरीकडे मानव जातीचा लंबूसारखा चमत्कारिक आविष्कार पाहून त्याच्या पोटात नि छातीत भयाचा फूटबॉल उसळत असे.

लंबू आपल्या घरापाशी आला. तिथं दोनचारशे फूट ओसाड जागा होती. तीत काही घरं होती. पण घरं अतिशय लहान

होती. खेळातल्या घरांसारखी. माणसाचे डोळे असतात, तेवढाल्या घरांच्या खिडक्या होत्या. तोंडं असतात, तेवढाली दारं होती. ही घरं लंबूसारख्या माणसाची असतील असं राजपुत्राला वाटेचना.



लंबू आपल्या घराशी आला. थांबला. पाहाता पाहाता लहान होऊ लागला. अखेर तो इतका लहान झाला, की राजकुमाराचे पाय जमिनीला लागले नि हत्तीच्या पोटाखालून कोकरू निसटावं तसा लंबू राजकुमारच्या पायांखालून अलगद निसटला. लंबूनं दार ठोठावलं. बायकोनं उघडलं. लंबू म्हणाला, "हे बघ, आपल्याकडे कोण आलंय !"

बायको बाहेर आली, तेव्हा ती राजकुमाराच्या करंगळीएवढी होती. तिचे हातपाय गांडुळाइतके जाड होते. तिनं तोंडावर हात ठेवला. राजपुत्राकडे पाहिलं. नवलानं विचारलं, "खरंच की हो. कोण हे पाहुणे ?"

राजकुमार थक्क होऊन पाहात होता. एवढ्या प्रचंड पुरुषाची

एवढीशी बायको म्हणजे नवलच नाही काय ! पायाशी येणारा एखादा कीटक चुकवावा तसा तिला चुकविण्यासाठी राजकुमार मागं मागं सरकत होता. भीत होता.

लंबूनं ताडलं. तो बायकोला म्हणाला, "अग, पाहुणे भितात तुला. जरा मोठी हो की."

"असं म्हणताय ?" तिनं विचारलं, "कुणाएवढी होऊ ? तुमच्याएवढी, की पाहुण्यांएवढी ?"

"तुला वाटेल तेवढी."

तशी लंबूची बायको भुईनळ्या सारखी सर् सर् सर् आवाज करीत मोठी होऊ लागली. पहिल्यांदा तिच्या पोटऱ्या राजकुमारच्या कमरेएवढ्या झाल्या. गुडघा डोक्याइतका झाला. पुढं पोटऱ्यांची जाडी प्रचंड पिंपळवृक्षाच्या बुंध्याएवढी झाली. राजकुमार भयभीत होऊन मागं मागं सरकत होता. पण ती सारीकडून सतत सारखी वाढत होती. लंबूनं राजकुमाराचा गोंधळ ओळखला. बायकोला म्हटलं, "अगं पुरे! नुसतं मोठं होऊन दाखव म्हटलं, तर याचा अर्थ आकाशाला डोकं टेकवावं असा नाही. तू माझी बायको आहे हे पाहुण्याला पटण्यापुरतं मोठं व्हावंस. आता पुरे करतेस मोठं होणं की मी होऊ तुझ्यापेक्षा मोठा आणि हाणू तुझ्या कपाळात दगड ?" अन् खरोखरच लंबूही मोठा होऊ लागला.

राजकुमाराची पाचावर धारण बसली. कारण ज्याच्या बायकोचं मोठे होणं अजून थांबलं नव्हतं, तिचा नवरा किती मोठा होऊ शकेल याची राजकुमार कल्पनाच करू शकत नव्हता. तो मागं मागं सरू लागला.

लंबूची बायको लंबूला भीत असावी. ती लगोलग लहान होऊ

लागली. मग लंबूलाही अधिक मोठं होण्याची आवश्यकता उरली नाही. दोघंही जेमतेम राजकुमाराएवढे झाले. राजकुमारच्या जवळ आले. लंबूनं बायकोला चहा ठेवायला सांगितलं. ती करंगळीएवढी झाली. घरात निघून गेली. लंबूपण करंगळीएवढा झाला. दारात शिरला. राजकुमाराला म्हणाला, " या, पाव्हणं."

पण राजकुमाराला त्या घरात शिरणं शक्य नव्हतं. तो गोंधळला. अडचण लंबूच्या लक्षात आली. त्यानं राजकुमाराला बाहेरच थांबायला सांगितलं. आतून चटई आणली. अंथरली. अंगणात बसवलं.

दरम्यान लंबूची बायको चहा-पाणी बाहेर आणत होती. दोघंही तो घेत होते. अखेर दिवस उजाडायला आल्याची जाणीव झाली. लंबूची बायको घरात पाहुण्यांसाठी स्वयंपाक करू लागली. लंबू नि राजकुमार बोलत होते. गप्पा करीत होते. आतापर्यंत राजकुमाराचा लंबूवर संपूर्ण विश्वास बसला होता. राजकुमार मोकळेपणानं बोलू लागला. आपला इथं येण्याचा हेतू सांगू लागला. लंबूनं ऐकलं. तो गंभीर होता. राजकुमार लंबूला म्हणाला, " माझ्या कामात तुझी चांगली मदत होऊ शकेल असं मला वाटतं. तू ती केलीस तर मी तुला माझ्या राज्यात नेईन. चांगल्या पगाराची मोठी नोकरी देईन. नोकरी नको असेल तर तुझ्या कित्येक पिढ्यांना पुरेल एवढं बक्षीस देईन. पण तू माझ्या मदतीला चलच."

लंबूला शंका होती. राजकुमारानं बिकट कामाचा विडा उचलला होता. लंबू डळमळला. म्हणाला, " हे मी आताच सांगू शकत नाही. थोड्या वेळानं आपण माझ्या मित्राला भेटू. त्याचा सल्ला घेऊ. त्यानं आपल्याला मदत करायचं ठरवलं की मीही

आपल्याला मदत करीन. त्याच्या मदतीनं आपलं काम सोपं होईल. नाहीतर फार कठीण आहे."

"हरकत नाही." राजकुमार म्हणाला, "तर मग चल तुझ्या मित्राकडे. आपण आताच त्याची गाठ घेऊ. काय ते ठरवू."

राजकुमार अधीर होता.

"थांबा. अद्याप तो झोपला असेल. उजाडल्यावर जाऊ. तोवर स्वयंपाक होईल. जेवण करू."

राजकुमार बोलला नाही. घाई करण्यात अर्थ नव्हता. जेव्हा कुण्या एकाची मदत घ्यायची असते, तेव्हा त्याच्याच कलानं घ्यायचं असतं.

लंबूनं बायकोला आवाज दिला. स्वयंपाक झाला होता. ती बाहेरच जेवण आणू लागली. जेवताना लंबू राजकुमाराएवढा होता. बायको वाढताना त्या दोघांएवढी असायची. काही आणायला घरात जाताना करंगळीएवढी व्हायची.

राजकुमाराला मोठी गंमत वाटत होती. जेवणापेक्षा गमतीनंच त्याचं पोट भरत होतं.

# ३. लंबूचा हात लांबतच राहिला !

सकाळी चहा झाला. लंबू नि राजकुमार लंबूच्या मित्राकडे जायला निघाले. लंबूचा मित्र खूप लांब राहात होता राजकुमाराने तिकडं जायला घोड्याची अपेक्षा केली होती. पण लंबूनं मित्राच्या मदती-शिवाय घोड्याचा शोध अशक्य असल्याचं सांगितलं होतं. अखेर राजकुमाराला लंबूच्या खांद्यावर बसावं लागलं होतं. हजार–हजार फुटांच्या ढेंगा टाकीत लंबू चालत होता. या वेळी लंबू केवढंही उंच झाड सहजपणे ओलांडीत होता. दोन झाडांच्यामध्ये जिथं अंतर असेल तिथं पाऊल ठेवत होता. राजपुत्राला मनोऱ्यावर बसल्यासारखं वाटत होतं. लंबूच्या भरभर चालीमुळं वाराही खूप लागत होता.

दुपारी ते एका डोंगराशी आले. डोंगर खूप उंच होता. लंबू पायथ्याशी थांबला. चालून तो थकला होता. घामानं डबडबला होता. त्याच्या छातीतून खूप घाम गळत होता. राजकुमाराला वाटलं : आपण एखादा धबधबा पाहातो आहे. त्यामुळं लंबू डोंगर शिखरावर जाण्याचं टाळू लागला. त्यानं एक हात कानावर ठेवला. दुसरा तोंडाला लावला. हळी घातली, "बुटक्या ऽऽ रेऽऽऽ"

राजकुमारानं कानात बोटं घातली. तरीही आवाजाला भेदरून तो बेशुद्ध पडला होताच. लंबूनं उपचार केला. राजपुत्र शुद्धीवर आला. या बाबीला तीन चार घटका लागल्या असतील; तरीही लंबूचा आवाज डोंगरकपारीत घुमत होता. प्रतिध्वनी सुरू होते. राजकुमारानं ऐकलं. विचारलं, "हे प्रतिध्वनी कसले ?"

"अहो, मघा मी हाक मारली ना त्याचे."

"इतका वेळ !" राजकुमार थक्क झाला.

"मग ?" लंबू अभिमानानं म्हणाला, "तरी मी हाक हलकेच मारली. बेंबीच्या देठापासून ओरडलो असतो ना, तर आठवडाभर प्रतिध्वनी उमटत राहिले असते."

"बापरे !" राजकुमार शहारला, "लंबू तू, माणूस आहेस की राक्षस रे ?"

"माणूसच सरकार." लंबू डोंगराकडे बघत होता. आपल्या हाकेला बुटक्याकडून अजून प्रतिसाद कसा मिळाला नाही ? लंबूनं विचार केला : हाक ऐकायला गेली नसेल. त्यानं पुन्हा कानावर नि तोंडावर हात ठेवले.

तशी राजकुमारानं त्याच्या हातावर उडी घेतली. घाबरला नि म्हणाला, "लंबू, काय वाटेल ते कर पण हाक मारू नको. मला राजकुमारी नाही मिळाली तरी चालेल. पण ही हाक नको."

लंबू गडागडा हसला. त्याच्या दृष्टीनं हे मंद स्मित असावं. मग त्यानं विचार केला, हाकेशिवाय बुटक्याला बोलवायचं कसं? डोंगर चढायला हवा. ते जीवावर आलं होतं. लंबूचा विचार झाला. त्यानं हात ताणला. एकच हात हवा तितका लांब झाला. डोंगरशिखराला टेकला. बुटक्याच्या झोपडीत बोटं घातली. या कोपऱ्यातून त्या कोपऱ्यात फिरवली. बुटक्या लहानशा खाटेवर

दा. क्र. ...२४२... दिनांक ......
विषय ..किशोर.. क्र. ..२२९..

झोपला होता. लंबूच्या बोटांनी खाट उलटून पालथी झाली. बुटक्या खडबडून जागा झाला. खाट त्याच्या अंगावर पडली. लंबूच्या बोटाला पालथ्या खाटेचे नुसते ठावेच लागू लागले. वस्तुत: अंगावर खाट पडल्यानं बुटक्या कोकलत होता. ओरडत होता. पण ते लंबूला समजणार कसं? बुटक्या लंबूसारखा गगन-भेदी आरोळी ठोकू शकत नव्हता.

लंबू राजकुमाराला एकीकडे म्हणत होता, "खाट पालथी आहे त्या अर्थी बुटक्या घरात दिसत नाही. पाण्याबिण्याला गेला असेल. एवढ्यात येईल. तोवर माझं बोट त्याच्या घरातच ठेवतो; म्हणजे मी आल्याचं त्याला कळेल."

राजकुमार नुसता पाहात होता. कारण सारा प्रकार नवलाच्या पलीकडचा होता.

तेवढ्यात बुटक्या कशीबशी खाटेखालून सोडवणूक करून घेऊन उठला. लंबूच्या बोटावर चढला. पाहाता-पाहाता तळव्यावर आला. लंबू म्हणाला, " महाराज, हातावर काही तरी आलंय. पण ते नेमकं काय आहे ते सांगता येत नाही. कदाचित् मुंगळा असेल, कदाचित् ढेकूण असेल. पण मला वाटतं, यांपैकी कुणी असतं तर एव्हाना निश्चित चावलं असतं. चावत नाही त्याअर्थी बुटक्याच असावा."

लंबूनं देवाचं नाव घेतलं. मूठ मिटली. हात आखडू लागला. तो अगदी खांद्याशी आला. तेव्हा त्याचा तळवा एखाद्या खुर्ची एवढा होता. सोफ्यावर माणसं बसतात, तसा बुटक्या लंबूच्या तळव्यात आरामशीरपणे बसून होता. जवळ आणल्यावर बाहुली ठेवावी तसं लंबूनं त्याला जमिनीवर ठेवलं. नंतर लंबूचा सारा आकार राजपुत्राएवढा झाला.

बुटक्या फक्त बुटका होता. त्याची उंची राजपुत्राच्या कमरे इतकी होती. केस पिकले होते. जाडी मात्र प्रचंड झाडाच्या बुंध्या-सारखी होती. दिसायलाही तो ओंडक्यासारखा ओबडधोबड होता.

लंबूनं ओळख करून दिली, "हे धवलराजचे कुमारनगर."

"नाही. नाही!" राजकुमार मधेच लंबूची चूक दुरुस्त करू लागला, "मी धवलनगरचा राजपुत्र धवलकुमार."

"माझंही म्हणणं तेच." पूर्वीच्या बोलण्यात आपली काही चूक झाली आहे याची कल्पना नसलेला लंबू म्हणाला, "हे धवलनगरचे राजकुमार धवलपुत्र आणि हा माझा मित्र. याला मी बुटक्या म्हणतो. बुटक्या तुझं नाव काय रे?"

"बुटक्या." बुटक्यानं राजपुत्राला दोन्ही हातांनी नमस्कार केला.

लंबू म्हणत होता, "महाराज, मी काल बोलत होतो तो हाच माझा मित्र. याला अंतरदृष्टी आहे. हा या ठिकाणाहून आपल्याला हवं ते सांगू शकेल. काही विचारायचं असल्यास विचारा."

राजपुत्राचा विश्वास बसेना. काहीतरी परीक्षा पाहायला हवी. त्याला घोड्याची आठवण झाली. तो बुटक्याला म्हणाला, "काल रात्री माझा घोडा हरवलाय."

"माहीत आहे. काल तुम्ही झाडावर झोपला असताना लंबू तुमच्याकडे आला. लंबूचा विचित्र अवतार पाहून घोडा बिचकला आणि पळाला. खरे आहे ना?"

राजकुमार चकित झाला. लंबूला आपल्या मित्राबद्दल अभिमान वाटला. राजकुमार बुटक्याला म्हणाला, "होय. तर हा घोडा आता कुठं असेल?"

" इथून पश्चिमेकडे, दोन मैलांवर तो आहे. "

" जिवंत आहे ? " लंबूनं विचारलं.

" होय. सध्या तो चरत आहे. रात्री एकदोनदा काही श्वापदांशी त्याची गाठ पडली होती. पण अस्वलाला त्यानं भिववलं. पळवलं. चित्त्यानं मात्र त्याच्यावर चाल करण्याचा प्रयत्न केला. घोडा जीव घेऊन पळाला. त्याच्या पाठीवर चित्त्याच्या नखांचे तीन ओरखडे आहेत. बाकी त्याला काही झालं नाही. "

" पण, तो आता शोधायचा कसा ?" राजकुमारानं चिंतेनं विचारलं.

" ते काम मी करतो. " लंबू म्हणाला. लगेच त्यानं आपला उजवा हात पश्चिमेकडे लांबवला. हात दिसेनासा होईपर्यंत लांबत राहिला.

पुढं लंबू जंगल चाचपत होता. बुटक्या सांगत होता, " तिथं नाही, थोडं पूर्वेकडे. फार झालं रे. आता उत्तरेकडे. फार झालं. हं–हं–हं–तिथंच ! अरेरे, चुकलास. पुढं गेलास. थोडं आणखी इकडे. आणखी थोडं. पुन्हा पुढे गेलास. करंगळीच्या दिशेने. पण थोडं मधल्या बोटाकडे. हां–हां–हां ! तिथंच. बोटं खाली कर. आणखी खाली. घोडा सरकतोय. थोडी घाई कर. तुझ्या पंजाला भितोय. तो दक्षिणेकडे गेला. हां–हां ! अगदी तिथंच."

" सापडला–सापडला !" लंबू आनंदानं ओरडला, " महाराज, तुमचा घोडा लाथा मारतो हो ! आई ग ! चावतोसुद्धा. पण आता कुठं जातोय म्हणा. पकडला एकदाचा !"

आता लंबूचा हात आखडू लागला होता.

राजकुमार लंबू नि बुटक्याकडे चमत्कारिकपणे पाहू लागला. पाहाता पाहाता लंबूच्या हातात घोडा दिसला. मांजरीच्या तोंडात



उंदीर लोंबकळतो तसा तो लोंबकळत होता पाय, शेपूट, तोंड यांची तडफड सुरू होती. घोडा अगदी पुढ्यात आणला गेला तेव्हा लंबूचा तळवाच तेवढा अजस्त्र होता. लंबूनं घोडा जमिनीवर ठेवला. घोड्यानं राजपुत्राला पाहिलं. ओळखलं. तो आनंदान खिकाळला. प्रेमभरानं राजपुत्राचे हात-पाय चाटू लागला राजपुत्रानं पाहिलं. घोड्याच्या पाठीवर खरोखर तीन ओरखड होते. राजपुत्राला बुटक्याच्या अंतरदृष्टीची खात्री झाली.

आपल्या कामी ही दोनही माणसं निश्चित उपयोगी पडू शकतील याचा राजकुमाराला विश्वास आला. त्यानं कामगिरीबद्दल सांगितलं, माणसं विचारात पडली. विशेषतः बुटक्या काही बोलेना. राजकुमाराला वाटलं : ती राजकुमारी वडिलांनी सांगितलं तितक्या संकटात खरोखरच आहे की काय ते बुटक्याकडून पडताळून पाहावं. राजकुमार म्हणाला, " सांग बुटक्या, माझ्या महालातील मनोऱ्यात असलेल्या युवतींपैकी आठव्या क्रमांकाची राजकुमारी खरोखरच अस्तित्वात आहे काय ?"

बुटक्यानं डोळे मिटले. विचार केला. पाहिलं. म्हणाला, "होय महाराज. तिचं नाव रूपमती आहे. ती कित्येक वर्षांपासून पोलादम् नावाच्या राजाच्या तावडीत आहे."

"पोलादम् नावाचा राजा ?" राजकुमारानं नवलानं विचारलं, "म्हणजे काय ?"

"या राजाच्या राजवटीत जिकडे–तिकडे लोखंडच लोखंड आहे. राजकुमारी रूपमती पोलादम्च्या भक्कम तुरुंगात कैदी म्हणून आहे. राजकुमारीसाठी प्रयत्न करणाऱ्या अनेक राजपुत्रांचा पोलादम्नं नाश केला आहे. राजपुत्र रूपमतीला मिळवण्यात असमर्थ ठरला की तो पोलादम्च्या पोलादम् महालात पोलादाचा निर्जीव पुतळा होऊन पडतो."

"पण ह्या पोलादम्चं राज्य आहे तरी कुठं ?"

"उत्तरेकडे. फार लांब आहे. पोचायला कित्येक महिने लागतील."

"पण, प्रयत्न केला तर रूपमतीची सुटका होऊ शकेल की नाही ?" राजपुत्रानं विचारलं.

"ते सांगता येत नाही." बुटक्या म्हणाला, "पोलादम् चेटक्या आहे. धूर्त आहे. कावेबाज आहे. तितकाच बलिष्ट आहे."

"पण कस्सून प्रयत्न केला तर ? यश येईल की नाही ?"

"ते मला नाही सांगता येत. मी ज्योतिषी नाही. भविष्यवेत्ता नाही. पाहिलेला असल्यानं भूतकाळ सांगू शकतो. वस्तुस्थिती सांगतो."

"तर मग आपण प्रयत्न करू या का ?" राजपुत्र म्हणाला, "तुमच्यासारखी अलौकिक शक्तीची माणसं माझ्या मदतीला असल्यास मी प्रयत्नात कसूर करणार नाही."

"पण उद्या जिवावर बेतलं तर ? लोखंडी पुतळा होऊन पडावं लागेल, याची कल्पना आहे ?"

"होय." राजकुमार आत्मविश्वासानं म्हणाला, "पण आपल्यावर तशी पाळीच येणार नाही. तुम्हा दोघांचं अलौकिक सामर्थ्य अन् माझं धैर्य आपणाला या सर्वांतून निभावून नेईल. तुम्ही माझ्या बरोबर चला. कामगिरीनंतर माझ्या राज्यात मोठ्या नोकऱ्या देईन. त्या नको तर तुमच्या कित्येक पिढ्यांना पुरेल असं बक्षीस देईन. पण नाही म्हणू नका."

बुटक्या नि लंबूनं आपसात विचार केला. राजकुमाराबरोबर जायचं ठरवलं. दोघांनीही आपापल्या बायकापोरांना निरोप पाठवले. मग बुटक्या खांद्यावर बसला. राजकुमार आपल्या घोड्यावर. ते सारे पोलादम् नगराकडे चालू लागले.

## ४. पोलादम् राज्यात प्रवेश

सुमारे सहा महिन्यांत राजपुत्र नि त्याचे नवे सोबती पोलादम् राज्यात शिरले. नगरात आले. त्यांनी महाल हुडकून काढला.

महालाला आवार होतं. आवाराच्या भिंती लोखंडी होत्या. किल्ल्यासारख्या त्या रुंद नि लांब होत्या. महाद्वारावर कुठलाच पहारा नव्हता. आवश्यकता तरी काय? अजस्त्र लोखंडी खांब तोफांनाही डगमगणारे नव्हते. शिवाय पोलादम् पट्टीचा चेटक्या होता. संकटाची चाहूल त्याला शेकडो मैलांवरून लागत असे. त्यामुळं महालाचे महाद्वार बंद करण्याची गरज नसे.

आता राजकुमार आणि त्याचे सोबती राजरोसपणे आवारात शिरले. आवारातील जमीन भिंतीसारखी उखणली होती. कुठं बाग नव्हती, बगीचा नव्हता, झाडं नव्हती, फुलं नव्हती. जिकडे तिकडे ओतीव लोखंड पसरलं होतं. त्याच्याच ओतीव वस्तू सर्वत्र दिसत होत्या. जागजागी लोखंडी पुतळे होते. गणवेशांवरून राजे महाराजांचे असावेत. बहुतेकांच्या हातात तलवारी होत्या. गळ्यात पुरुषी अलंकार होते. अंगावर राजेशाही झगे होते.

कमरेला तुमानी होत्या. डोक्यांवर मुगुट होते.

ते तिघे प्रत्यक्ष महालाकडे आले. महालसुद्धा ओतीव लोखंडाचाच होता. माणसांचा कुठं थांगपत्ता नव्हता. ते तिघं इथं चोर म्हणून आले नव्हते. त्यांना चोरी करायची नव्हती. राजरोसपणे प्रवेश करून पोलादम्शी त्यांना बोलायचं होतं. परंतु आत जाण्याची परवानगी घ्यायला मध्ये कुणी भेटायला तर हवं ना ? त्यांना कुणी दिसत नव्हतं. ते दिसेल तो रस्ता चालत होते. दारं ओलांडीत होते. जिने चढत होते.



एका सज्जातून चालत असता त्यांच्या कानावर हसण्याचा गडगडाट आला. ते थांबले. ओलांडलेल्या दाराकडे फिरले. पाहिलं. लोखंडाच्याच घडवलेल्या एका दालनात लोखंडाचे आलिशान फर्निचर होतं. एका आरामखुर्चीत पोलादम् स्वतः बसला होता. या दालनात तो स्वतः नि त्याच्या अंगावरील वस्त्रंच तेवढी लोखंडाची नव्हती.

नवागत पाहुण्यांना पाहून पोलादम् आणखी एकदा हसला. मग स्वागतासाठी उभा होत म्हणाला, " यावे धवलकुमार. ! आपण धवलनगरीच्या धवल महाराजांचे एकुलते एक पुत्र आहात ना?"

" होय." राजकुमारही बोलण्यात कमी खवचट नव्हता. तो म्हणाला, " आपण पोलादम् राज्यातील पोलादम् नगरीचे पोलाद महाराज आहात ना ?"

" होय." पोलादम्‌ला टोमणा झोंबला. किंचितसा चिडून तो म्हणाला, " पण हे सारं निर्माण करायला पोलादी कौशल्य हवं असतं."

" की पोलादी हृदय ?"

" काहीही समजा. आपला इथं येण्याचा हेतू ? " पोलादम् मिस्किलपणे म्हणाला. वस्तुतः त्याला सारं माहीत होतं.

राजकुमारानं हेतू विशद केला.

पोलादम् म्हणाला, " ठीक आहे. राजकुमारी रूपवती माझ्या बंदिवासात आहे. माझ्या तीन अटी जो पूर्ण करू शकेल, त्यातून जो निभावू शकेल–त्यालाच राजकुमारी मिळवणं शक्य आहे."

" त्या अटी कोणत्या ? "

" तशी अट एकच आहे." पोलादम् ताठ्यात बोलला, "परंतु मी तिचे सोयीसाठी तीन विभाग पाडले आहेत. तीन दिवस ठरवले आहेत. मी स्वतः राजकुमारीला तुमच्या ताब्यात देईन. तुम्ही तिच्यावर लक्ष ठेवायचं. रात्री किंवा वाटेल तेव्हा कधीही मी तिला पळवण्याचा प्रयत्न करेन. हा प्रयत्न सतत तीनदा केला जाईल. या प्रयत्नात मी यशस्वी ठरलो, मी पळवलेली राजकुमारी वेळेच्या आत आपण शोधून काढू शकला नाहीत, तर तो आपला पराभव समजला जाईल. आपला पराभव

झाल्यास आपल्याला माझ्या आवारात लोखंडी पुतळा होऊन पावसापाण्यात झिजत रहावं लागेल. येताना असे कितीतरी पुतळे पाहिले असतीलच. आहे कबूल ? "

" पण आम्ही राजकुमारीचं संरक्षण करण्यात यशस्वी ठरलो तर ?" राजकुमारनं धाडसानं विचारलं.

" राजकुमारी आपली होईल. "

" तर मग आपली अट मला संमत आहे. "

" विचार करून बोला धवलकुमार ! " पोलादम् कुचेष्टेनं म्हणाला, " हा पोरखेळ नाही. मोठमोठ्या राजकुमारांनी इथं हात टेकले काहेत. "

" मी विचार केला आहे. आपली अट मला संमत आहे. " राजकुमार निर्धारानं म्हणाला.

" ठीक आहे." पोलादम् म्हणाला, "आजच रात्रीपासून आपण कामाला लागू या. "

राजपुत्र संमत झाला. नंतर पोलादम्नं पाहुण्यांच्या आगत-स्वागताची तयारी केली. राजकुमारबरोबर बुटक्या नि लंबू यांनाही पोलादम्चा पाहुणचार मिळू लागला.

## ५. पोलादम्चा पराभव

रात्रीची वेळ होती. पोलाद महालातील एका भव्य दालनात राजकुमार रूपमतीवर पहारा करीत होता. त्याच दालनाच्या एका भिंतीला गजांचं दार होतं. दाराला लोखंडी कुलूप होतं. पलीकडे एक माणूस जेमतेम झोपू शकेल इतक्या लांबीरुंदीची लोखंडी कोठडी होती. कोठडीत लोखंडी पलंग होता. पलंगावर अंथरुण नव्हतं. रूपमती तशीच पडून होती. या कोठडीतून बाहेर पडायचं झाल्यास सध्या राजकुमार पहारा करीत होता, त्या दालनात येणाऱ्या गजांच्या दारातूनच बाहेर पडावं लागत होतं. त्या खोलीत कुणाला शिरायचं असल्यासही याच दालनातून जाणं भाग होतं.

राजकुमारीच्या संरक्षणाची ही व्यवस्था राजकुमारानं स्वतःच्या इच्छेप्रमाणं करवून घेतली होती. त्याला पोलादम्नं ती सवलत दिली होती. म्हणजे नंतर शंकाकुशंका निघायला नको. कोठडीला इतर गुप्त दारं–खिडक्या होत्या, असं म्हणायला नको.

आता राजकुमार तलवार खांद्यावर ठेवून कोठडीच्या दाराशी जागता पहारा करीत होता. दारावरून चार फूट पुढं जात होता.

चार फूट मागं येत होता. येता जाता आतल्या रूपमतीला बघून घेत होता. ती अंथरुणात पडून असल्याचं पाहात होता. त्याला समाधान मिळत होतं.

पळांमागून पळ अन् घटकांमागून घटका जात होत्या. ही रात्र राजकुमाराला अतिशय कठीण जात होती. हिंस्त्र श्वापदांच्या जंगलातील झाडांवर एकटा झोपला असताना गेली नव्हती तितकी भीषण अन् बिकट जात होती.

राजकुमार फिरत होता. पहारा करीत होता. जाता येता कोठडीतील रूपमतीकडे पाहात होता.

पाहाता पाहाता त्याला धक्का बसला. रूपमती कोठडीत दिसली नाही. त्यानं कुलूप उघडलं. दार काढलं. आत पाहिलं. कोठडी जशीची तशीच होती. वारंसुद्धा शिरायला जागा नव्हती. मग रूपमती गेली कुठून ? कुठं ? कशी ? दारावर तो स्वतः होता. दाराला कुलूप होतं. किल्ली त्याच्यापाशी होती.

राजकुमारानं कोठडीचा कोनाकोपरा छानून काढला. पाहायचं तिथं भिरभिरी पाहिलं. रूपमतीचा पत्ता नव्हता.

राजकुमार घाबरला. आपल्या पराभवाची त्याला लाज वाटली. दगडी पुतळा होऊन पडण्याचं भय वाटलं. क्षणभर सुन्न झाला. काही सुचेना. अखेर त्याला आपल्या सोबत्यांची आठवण झाली. तो तडकाफडकी सोबत्यांच्या दालनात आला. लंबू नि बुटक्या घोरत होते. लंबूच्या घोरण्यानं पलीकडील पलंगावरील बुटक्या वाऱ्याचं पान हलतं तसा हलत होता. लागावी तशी झोप बुटक्याला लागली नव्हती. त्यामुळं राजकुमाराच्या पहिल्याच हाकेनं बुटक्या जागा झाला. उठून बसला. तो बोलणार त्यापूर्वी

राजकुमार म्हणाला, "बुटक्या, रूपमती नाहीशी झाली रे ! कोठडीत नाही. पोलादम्‌नं तिला पळवलेली दिसते."

"असं म्हणताय महाराज ?" बुटक्यानं डोळे चोळले. उगाच कळवळला, "अरेरे ! फार वाईट झालं. आता कसं ?"

"आता कसं म्हणून काय विचारतोस बुटक्या ?" राजकुमार बेचैन होता, "आपल्याला तिचा शोध लावला पाहिजे. नाहीतर लोखंडी पुतळे होऊन पडू. पावसापाण्यात झिजू. तू काहीतरी कर. राजकुमारी कुठंय, हे तू सांगू शकशील की नाही ?"

"होय. तेवढं मी नक्की करू शकेन." बुटक्या म्हणाला, "पण तिला आणण्याचं काम माझ्याच्यानं होणार नाही."

"ते नंतर बघू. रूपमती कुठं आहे ते सांग." राजकुमार अधीर झाला.

"सांगतो." बुटक्यानं पालखट मारली. पद्मासन घातलं. हात जोडले. डोळे मिटले. पळ दोन पळ स्वस्थ राहिला. मग म्हणाला, "इथून वायव्येकडे सुमारे सहा मैलांवर एक गुहा आहे. गुहेत सध्या राजकुमारी रूपमती लपवली गेली आहे."

"असं म्हणतोस !" राजकुमार थक्क होऊन बोलला, "पण हे काम आहे कुणाचं ? राजकुमारीची कोठडी ओतीव लोखंडाची आहे. खिडक्या नाहीत. झरोके नाहीत. एकुलतं एक दार आहे. पण ते मी होतो त्याच दालनात आहे. एवढ्या कडक बंदोबस्तातून ती पळवली गेली कशी ? मी कुणाला पाहिलं नाही. रूपमतीला देखील बाहेर पडताना पाहिलं नाही. मला नवल वाटतं. तिला कुणी पळवलं ?"

"पोलादम्‌नं."

" कसं शक्य आहे ? "

" तो चेटक्या आहे. मघा आपण पाहिलंच."

" त्यानं आपल्याला तीनदा पराभव करण्याचं आव्हान दिलं आहे. ते आपण करू शकलात, तर प्रत्येक पराभवासरशी पोलादमचा एकेक पट्टा आपोआप गळून पडत जाईल. अशा रीतीनं तीनही पट्टे गळून पडले की पोलादम् आपलं काहीही करू शकणार नाही. आपण त्याचं हवं ते करू शकू. एवढंच नाही तर यापूर्वी लोखंडी पुतळे होऊन पडलेले सर्व राजे–महाराजे सजीव होतील. पोलादम्च्या तावडीतून त्यांची सुटका होईल. मुक्तता होईल."

" परंतु हे पट्टे गळून पडतील कसे ? "

" त्यानं लपवलेली रूपमती हुडकून काढली की एक पट्टा आपोआप गळून पडतो. असं तीनदा करायचं. यशस्वी झालात की आपण जिंकलात. नाहीतर लोखंडी पुतळा व्हावं लागेल. "

" तर मग चल माझ्यासोबत." राजकुमारानं बुटक्याचा हात धरला.

" कुठं ? "

" ती गुहा दाखवायला."

" नाही रे बुवा ! आपल्याच्यानं एवढ्या रात्री इतक्या लांब चालणं होत नाही." बुटक्या कानांवर हात ठेवून म्हणाला, " शिवाय वेळेच्या आत काम व्हायला हवं. त्याची मी हमी देऊ शकत नाही."

राजकुमारानं विचारलं. लंबूला जागं केलं. हकीगत कथन केली. लंबू आळस नि जांभया देत होता. सारं ऐकून झालं. अखेर लंबूनं विचारलं, " अखेर आपलं म्हणणं काय महाराज ?"

" माझं म्हणणं तू बुटक्याला खांद्यावर घ्यावं. चला. निघा वेळ घालवू नका. रात्र थोडी राहिलीय."

लंबूच्या डोक्यात प्रकाश पडला. तो उठला. बुटक्याला खांद्यावर घेतलं, महालात असताना स्वतःची उंची जेमतेम दारांइतकी ठेवून लंबू चालत होता. आवारात असताना उंचच उंच झाला. घोड्यावर बसलेला राजकुमार जेमतेम त्याच्या गुडघ्याइतका दिसत होता. खांद्यावरचा बुटक्या एखाद्या चंबूएवढा दिसत होता. लहान व्हावं लागेल नि वेळ जाईल म्हणून बुटक्या महाद्वारातून चालला नाही. त्यानं एका ढेंगेत कोट ओलांडला. पुढं झपाझप चालू लागला.

त्याच्या तुलनेत राजकुमाराचा घोडा फारच मंद होता. बिचारा राजकुमार घोड्याला बडवत होता. पळवत होता. घोड्याची दमछाक होत होती. पण त्याच्यातलं अंतर वाढतच होतं. अवघ्या दोन मैलात एक मैलाचं अंतर पडलं. राजकुमार ओरडू लागला. पण लंबूला ऐकायला येईना. तो चालतच होता. बुटक्यानं सांगितलेल्या रस्त्याप्रमाणं. शेवटी राजकुमाराला लंबू दिसेनासा झाला. रस्ताही दिसेना. राजकुमार गोंधळला. कुठं जावं ते कळेना. सुचेना.

लंबूचं चार मैल चालून झालं. लंबूला राजकुमाराचं स्मरण झालं. त्यानं पाहिलं. राजकुमाराचा पत्ता नव्हता. हाका मारणार होता. पण बुटक्यानं हरकत घेतली. लंबूचं ओरडणं बुटक्याच्या चांगलं परिचयाचं होतं! तो म्हणाला, " उगाच ओरडू नको. मी मघाच म्हणायचा, हळू चल रे! हळू चल रे! तर ऐकलं नाही. आता राक्षसासारखं ओरडून काय उपयोग आहे ? त्यापेक्षा मागं चल. राजपुत्राला घेऊन येऊ."

" आता आणि मागं ? " लंबू कंटाळून बोलला, " अशक्य. मी फार थकलोय, त्यापेक्षा असं करू. राजकुमार कुठं आहे ते तू मला सांग. मी हातात पकडून इथं आणतो. "

बुटक्याला पटलं. त्यानं सांगितलं. " लांबव हात, आणखी–आणखी ! आणखी ! फार झाला रे. थोडा आखूड कर. किंचित फार झाला रे. किंचित लांब कर. अंगठ्याकडं, आणखी अंगठ्याकडं. आता थोडं अनामिकेकडं. हं–हं ! तिथंच. बोटाला झाड लागतंय ना तिथंच. झाड हलव म्हणजे राजकुमार तुझ्याकडं पाहील. एवढ्या जोरानं हलवू नकोस रे. तो भिईल. हं ! ठीक आहे. बघ–बघ, राजकुमारचं लक्ष गेलंय. तो येतोय. आला आला. तुझं बोट धरू इच्छितो. थोडं खाली कर. आणखी थोडं. हळू हं ! नाहीतर करशील त्याचा कपाळमोक्ष. आणखी थोडं. हं ! पुरे. बघ राजकुमार तुझ्या बोटाला लोंबकळतोय. "

" होय रे बुटक्या– " आता लंबूला राजकुमारचा स्पर्श जाणवला. लंबूनं हात सरळ केला. राजकुमार घोड्यासह लंबूच्या तळव्यावर चढला. मग लंबूनं हात आखडला. दोनचार क्षणात राजकुमार त्यांच्या पुढ्यात हजर केला गेला. लंबू म्हणाला, " काय महाराज, कुठं होतात ? "

राजकुमार घाम पुशीत म्हणाला, " तू थोडं हळू चालायचं होतंस की नाही ? तरी मी किती ओरडायचा. पण ऐकायला देखील तयार नव्हता. त्यामुळं अंतर पडलं. "

" अहो, पण अशानं वेळेच्या आत काम व्हायचं कसं ? आता हे सहा मैलांचं अंतर आहे म्हणून ठीक. उद्या त्या पोलादमन्नं राजकुमारीला पंचवीस मैलावर लपवलं म्हणजे ? "

राजकुमार बोलला नाही. बुटक्या मध्येच म्हणाला, " आता

गप्पात वेळ घालवू नका. रात्र थोडी राहिलीय. काम झालं नाही तर लोखंडी पुतळा–"

लोखंडी पुतळ्याचं नाव ऐकताच लंबू अन् राजकुमार थरारले. नव्या योजनेप्रमाणं राजकुमार लंबूच्या दुसऱ्या खांद्यावर बसला. घोडा तिथंच बांधून ठेवला. ते चालू लागले. पापणीचं पातं लवतं न लवतं तर गुहेपाशी आले. बुटक्यानं गुहा दाखवली. "ही ती गुहा. याच गुहेत पोलादम् राजकुमारीला घेऊन लपला आहे."



राजकुमारानं पाहिलं. गुहेचं तोंड फारच लहान होतं. आत शिरायचं कसं ? जेमतेम करंगळीएवढा माणूस आत शिरू शकत होता. राजकुमारानं विचारलं, "बुटक्या, एवढ्याशा तोंडातून पोलादम् राजकुमारीला घेऊन आत कसा शिरला ?"

बुटक्या म्हणाला, "त्यांना शिरण्याचे दार वेगळं आहे. त्याला प्रचंड कुलूप आहे. आपल्यापैकी त्या दारातून कुणाला जाता येत

नाही. वारंसुद्धा शिरू शकत नाही. तेव्हा या गुहेत शिरण्याचा मोठ्यातला मोठा रस्ता मी तुम्हाला दाखवला.

"पण त्यात शिरायचं कसं ?" राजकुमारानं काळजी व्यक्त केली.

बुटक्यानं लंबूकडे पाहिलं. हसून म्हणाला, " हा कशासाठी आहे ?"

लंबू समजला. हसला. पाहाता पाहाता तो करंगळीएवढा झाला. सापासारखा लांब होत मग गुहेत शिरला. नाहीसा झाला.

राजकुमार अन् बुटक्या बाहेर उभे होते. राजकुमारानं बुटक्याला विचारलं, " समजा, आता लंबू आत जाऊन पोलादम आणि राजकुमारीस शोधीलही, पण मग ती बाहेर कशी येतील?",

" त्याची काळजी करू नका. लंबूचे डोळे त्या दोघांवर पडले नजरानजर झाली की, पोलादम्‌चा एक पट्टा गळून पडेल. एक. तृतियांश प्रमाणात पोलादमचे चेटकीपण निकामी होईल. तो आला त्या लोखंडी दाराचे कुलूप गळून पडेल. त्यामुळं लंबू त्यांना त्या दारातून बाहेर काढू शकेल. बुटक्या एकाएकी सूर बदलून म्हणाला, " बघा-बघा ! मी म्हणालो तसंच होतंय. लंबूनं त्यांना शोधलंय. पट्टा गळून पडलाय. पोलादम्‌चा चेहरा पांढरा-फटक पडलाय. तो काळजीत पडलाय. स्वतःहून लंबूच्या स्वाधीन होतोय. झालाच. रूपमतीपण झाली, ती हसतेय बरं का राजकुमार ! बघा किती सुंदर हसतेय. लंबूनं त्यांना खांद्यावर घेतलंय. निघालाच तो दाराकडून. छान ! बघा बाहेरसुद्धा पडलाय. आला-आला!"

राजकुमार आगं-मागं पाहू लागला. अंधारामुळं त्याला काहीच दिसेना.

बुटक्या म्हणाला, " तिकडे काय बघताय ? हा पहा–"

तेवढ्यात लंबूचं गडगडून हसणंच राजकुमाराला ऐकू आलं. राजकुमारानं पाहिलं. लंबूच्या खांद्यावर खरोखरच रूपमती आणि पोलादम् होती. पोलादम्चा चेहरा शरमिंदा झाला होता. राजकुमारला पाहून रूपमती सुंदर सुंदर हसत होती.

नंतर लंबूनं राजकुमार नि रूपमती एका खांद्यावर आणि एका खांद्यावर बुटक्याला घेतलं. आणि त्यानंतर पोलामदम्ला तिथंच ठेवून लंबू चालू लागला. राजकुमारचा घोडा होता तिथपर्यंत ते तसेच आले. मग राजकुमार घोड्यावर बसला. रूपमती पण बसली. बुटक्या लंबूच्या खांद्यावरच होता. सारेजण पोलदमहालाकडे चालू लागले. पोचले.

पाहातात तर पोलादम् महालाच्या दारात हजर होता. रूपमतीला त्यानं ताब्यात घेतलं. गडगडून हसत म्हणाला, " अजून अटी पूर्ण झाल्या नाहीत म्हटलं. सध्याच शेफारून जाऊ नका. अजून दोन रात्री जायच्या आहेत. द्या रूपमतीला माझ्याकडं आणि घ्या विश्रांती–"

राजकुमारनं रूपमतीचा ताबा सोडला. नाहीतरी तो तो सोडणारच होता. अटी पूर्ण व्हायची त्याला जाणीव होती. तसं नसतं तर तो मघाच राजकुमारीला घेऊन पसार झाला असता, परंतु पहिल्या पराभवानं चिडलेल्या पोलादम्ला माणुसकी दाखवण्याइतका धीर नव्हता. त्यानं राजकुमारीला ताब्यात घेतलं. अंधारकोठडीकडं नेलं.

राजपुत्र, लंबू नि बुटक्या आपल्या दालनाकडे निघून गेले. रात्र होण्याची वाट पाहू लागले.

# ६. राजकन्या दगड झाली !

दुसरी रात्र झाली. राजकुमार पहारा करीत होता.

आता पहाऱ्याचा प्रकार वेगळा होता. राजकुमारी एका ओतीव लोखंडी पेटीत झोपली होती. पेटीला श्वासोच्छ्वासापुरती हवा जाऊ शकेल एवढी बारकी छिद्रं होती. रेडिओ–केसला असतात तशी. मजबूत झाकण होतं. भक्कम कुलूप होतं. चावी राजकुमारच्या खिशात होती. दगाफटका होऊ नये म्हणून राजकुमारनं ती कमरेला करकचून बांधली होती. राजकुमाराचं अंथरुण पेटीवरच होतं. कारण रात्री त्याचं जागरण झालं होतं. झोप लागण्याची शक्यता होती. असं काही झाल्यास कुणी पेटी उघडली तर आपल्याला वेळीच जाग यावी या दक्षतेनं राजकुमारनं आज राजकुमारीच्या संरक्षणाची अशी व्यवस्था केली होती. संरक्षकाच्या सोयीनुसार व्यवस्था करण्यास पोलादम्‌ची संमती होती. हरकत नव्हती.

मध्यरात्रीपर्यंत राजकुमार जागा होता. तलवार घेऊन पेटीभोवती गस्त घालीत होता. नंतर थकला. पेटीवर बसून राहावं असं वाटलं. बसला. मग डुलक्या येऊ लागल्या. तोल सावरेनासे

झाले. दोनदा तोल गेला. एकदा राजकुमार पडता पडता सावरला. दुसऱ्यांदा मात्र तोंडावर पडला. मग त्यानं ठरवलं आडवं व्हावं. झाला. झोप लागली. घोरू लागला.

तसं त्याला स्वप्न पडलं. पोलादम् आला आहे. कुलूप काढतोय. पेटी उघडतोय. झाकण वर केल्यानं आपण वाकडे झालोय. पडलोय. राजकुमार स्वप्नात ओरडला, " पडलो-पडलो-पडलो ! "

त्याला जाग आली. तो पेटीवरच होता. पडला नव्हता. चावी पाहिली. ती कमरेला तशीच होती. पेटीला कुलूप होतं. झाकण पण हललं नव्हतं. तरीही राजकुमारला स्वस्थ वाटेना. त्यानं पेटी उघडली पाहिली. आत रूपमतीचा पत्ता नव्हता. त्यानं पेटीत पाहू नये इतकं पाहिलं. अंथरुणात ढेकूण पहातात तितक्या बारकाईनं. जणू रूपमती गादीच्या एखाद्या सुरकुतीत दडून बसली होती. पण काहीं केल्या रूपमती दिसत नव्हती.

राजपुत्र घाबरला पळतच बुटक्याकडं आला बुटक्या जागाच होता. म्हणाला, " या महाराज, मी आपलीच वाट पहात होतो. "

" म्हणजे ?" राजकुमार घाईनं म्हणाला, " रूपमती पळवली गेल्याचं तुला माहीत झालं ?"

" त्यात काय मोठंसं ?" बुटक्या म्हणाला, " तिच्यावर तुमचा पहारा सुरू होण्यापूर्वीच ती पळवली गेलीय–"

" आँ ? म्हणतोस काय ? कसं शक्य आहे ? मी तिथून हललो नाही."

" मीही तेच म्हणतोय. पहारा सुरू झाल्यापासून तुम्ही हलला नाहीत हे नक्की. पहारा सुरू होण्यापूर्वीच ती पळवली गेलीय–"

" शक्य नाही. कुलूप लावताना पेटीत मी तिला पाह्यलंय. माझ्या हातानं कुलूप लावलंय–"

" पण ती पेटी ही नाहीच महाराज ? ती पेटी दुसरी होती. ही पेटी दुसरी आहे–"

" पेटी बदलली कशी ? कुणी ?"

" पोलादम्नं. तुम्ही कुलूप लावल्यावर दालनाचं दार बंद करण्यासाठी पाठमोरा झालात त्या दरम्यान पेट्यांची अदलाबदल झाली."

या विषयावर शंका कुशंका काढण्यात नि वाद घालण्यात वेळ घालवणं व्यर्थ होतं. राजकुमारी नाहीशी झाली हे निश्चित होतं. वेळेच्या आत तिचा शोध लावणं सर्वात महत्त्वाचं होतं. शिवाय जो पोलादम् आव्हानानं राजकुमारीची चोरी करू शकतो त्याला हजारो युक्त्या अवगत असण्याची शक्यता होती. त्याखेरीज तो आव्हान देईलच कशाला ?"

राजकुमारनं विचार केला. बुटक्याला विचारलं, " पण आता राजकुमारी आहे कुठं ?"

" नैऋत्येकडे, सोळा मैलावर एक डोंगर आहे. त्या डोंगरावर. पण आता ती तिथं राजकुमारी म्हणून नाही. एक दगड म्हणून पडलीय."

" दगड म्हणून ?"

" होय–"

" डोंगरावर तर खूप दगड असतील रे–"

" कोट्यावधी."

" तर मग त्यातून तिला ओळखायचं कसं ?"

"महत्त्वाचा प्रश्न तोच आहे. तुमची दिशाभूल होण्यासाठीच पोलादम्नं रूपमतीला दगड बनवून डोंगरावर ठेवलं आहे. तो पाहा तो दगड त्याला चुन्याचं एक बोट लावलंय. पण ते आपल्याला ओळखायला नव्हे बरं! आपण पराभूत झालो तर पोलादम्वरच तिला हुडकण्याची पाळी येईल. त्यावेळी त्याचाच घोटाळा होऊ नये म्हणून त्यानं दगडाला चुन्याचं बोट लावून ठेवलंय."

"याचा अर्थ खुणेवरून तो दगड आपल्यालाही ओळखता येईल असा नाही काय?"

"अर्थातच."

"तर मग चला." राजकुमार लंबूला हलवून जागं करू लागला. बुटक्याला म्हणत होता, "दाखव तो दगड मला."

बुटक्या उठला. लंबूपण उठला. राजकुमार नि बुटक्याला लंबूनं खांद्यावर घेतलं. मागल्या खेपी घोडचामुळं राजकुमाराची फजिती झाली होती. वेळ वाया गेला होता. म्हणून या वेळी तो लंबूच्या खांद्यावर बसला.

मोठमोठ्या ढेंगा टाकीत लंबू नैऋत्येकडं चालू लागला. डोंगरापाशी थांबला. वर चढणं त्याच्या जिवावर आलं. थकलाही होता. त्यामुळं त्यानं डोंगराच्या पायथ्यालाच उभं राहून शिखराला हात पुरवले. बुटक्याच्या सांगण्याप्रमाणं दगड चाचपू लागला.

पण जमेना. लाखो दगड तिथं होते. तो सारखा इकडचा तिकडं चाचपत होता. पंजा फिरवत होता. बोटं चाळवत होता. दगड हातात घेत होता, पण ते चुकीचे निघत होते. दोन-चार



गड त्याच्याच धक्क्यानं कडेवरून कोसळले होते. एकात लंबूची करंगळी चेंगरली होती. एकामुळं अनामिकेच नख उडालं होतं. डोंगरावरील झाडा-झुडपांचे अन् काटचा-कुटचांचे असंख्य ओरखडे पंजाला लागले होते.

तरी लंबू जेरीस आला नसता. परंतु त्याच्याच धक्क्यानं खुणेचा दगड पालथा झाला होता. त्यामुळं बुटक्याला तो ओळखू येईनासा झाला. बुटक्याला सांगता येईना. लंबू नि तो गहन विचारात पडले.

राजकुमारचं धाबंच दणाणलं. बुटक्या नि लंबूनं हात टेकल्या-वर तो बिचारा काय करणार ? नुसता घाबरला. डोळचांपुढं पोलादी राजपुत्र दिसू लागला. त्यातच स्वत:चाही पुतळा होऊन पडलाय असं राजपुत्राला स्पष्ट दिसू लागलं. तो हताश झाला. रडवेला होऊन सारखा म्हणत होता, "लंबू काहीतरी कर

बुटक्या प्रयत्नात चुकू नकोस. नाहीतर थोडाशासाठी माझ्याबरोबर तुम्हालाही प्राणाला मुकावं लागेल.

ही भीती त्या दोघांनाही होतीच. आपापल्या परीनं विचार करीत होते. लंबूचं डोकं चाललं. म्हणाला, "एक प्रयत्न करून पाहातो. बुटक्या, तू माझ्या मुठीत बस. मी तुला डोंगरावर सोडतो. तिथं तुला वाटलेले दगड तू बारकाईनं बघ. शंका असेल ते उलथ. अशातच एखादा दगड खुणेचा निघेल.".

बुटक्याला पटलं. थोडीफार तिघंही आनंदीत झाली. लंबूनं हात आखडला. बुटक्याला तळव्यावर बसवलं. हात पुन्हा शिखरापर्यंत लांबवू लागला. बुटक्या खुणेचा दगड होता त्या दरम्यान फिरू लागला. त्याला एका दगडाची शंका आली. पण तो दगड प्रचंड होता. बुटक्याकडून हलत नव्हता. बुटक्या लंबूच्या तळव्याकडं बघत होता. करंगळी खांद्यावर ठेवली. दगडाकडं चालू लागला. तळवा दगडापाशी आणला. दगडाला लावला. म्हणजे जेमतेम स्पर्श केला. परंतु तळव्यानं पुढं काहीच केलं नाही. तसाच राहिला. कारण लंबूला वाटत होतं, हवा तो दगड सापडला की तो घेऊन बुटक्या तळव्यावर चढेल. आपण आपला हात आखडू. बुटक्या आणि दगड आपल्या पुढ्यात येतील.

परंतु बुटक्याला तो प्रचंड दगड नुसता उलथून पाहायचा होता. त्यानं तळवा नि दगड यांच्यात करता येतील तेवढ्या खाणाखुणा केल्या. पण त्यांचा अर्थ लंबूला समजेना. बुटक्या ओरडू लागला. ते लंबूला ऐकायला येईना. बुटक्यापुढं पेचच पडला. आता काय करावं ? त्यानं विचार केला; वेळ होत होती. सुचत काही नव्हतं.

अखेर ठरल्याप्रमाणं हाताला लागेल तो दगड घेऊन बुटक्या लंबूच्या तळव्यावर चढला. लंबूला वाटलं, हवा तो दगड सापडलाय. त्यानं हात आखडला. बुटक्याला पुढ्यात आणलं विचारलं, " कारे, सापडला ना आपला दगड ? "

बुटक्या संतापला. सोबत आणलेला दगड दोन्ही हातानं उचलला. जमिनीवर आदळला. तणतणत म्हणाला, " बोडकं तुझं. लेकाला हज्जारदा खुणावलं, की अमुक एक दगड उलथव. पण लेकाचा मख्ख राहिला. बोललो तेही ऐकायला आलं नाही. अखेर आणला हा धोंडा. घालू तुझ्या कपाळात ? "

राजकुमार सावरला. अशा परिस्थितीत उगाच बाचाबाची करण्यात अर्थ नाही. वेळ जाईल. त्यानं दोघांच्या अडचणी समजावून घेतल्या. तोड काढली. मग त्यांच्यात ठरलं, बुटक्यानं पुन्हा डोंगरावर जायचं. पूर्वेकडं हात करायचा असल्यास अंगठ्याला स्पर्श करायचा. पश्चिमेसाठी नंतरच्या बोटाला. उत्तरेसाठी मधल्या बोटाला, दक्षिणेसाठी अनामिकेला. दगड उलथवायचा झाल्यास बुटक्या ज्या दगडावर करंगळी ठेवील तो दगड उलथायचा. बुटक्यान पहायचा. आवश्यक तो दगड निघाल्यास बुटक्यानं मनगटाला तीनदा चावे काढायचे. नंतर लंबूनं बुटक्या ज्या दगडावरून चावे काढील तो दगड बुटक्यासह तळव्यावर घ्यायचा. तळवा आखडायचा की काम झालं." सर्वानुमते हे ठरलं. ठरलेल्या खाणाखुणा न विसरण्याची राज-कुमारनं दोघांना ताकीद दिली. बुटक्या तळव्यावर बसला. लंबूनं हात लांबवला. शिखरावरील दगडांची शोधाशोध सुरू झाली.

काही वेळ खाणाखुणात चुकामूक व्हायची. हात पूर्वेकडं

सरकवला जाण्याऐवजी उत्तरेकडं सरकवला जायचा. लंबूला राजकुमार खाणाखुणांची आठवण करून द्यायचा. शेवटी सारं जमलं. वरवंटयाच्या आकाराचा एक गुळगुळीत दगड बुटक्याच्या हाती लागला. खूण दिसली. तो घेऊन बुटक्या तळ्यावर चढला. लंबूनं मूठ आवळली. हात आखडला. दगड नि बुटक्या डोंगर-पायथ्याशी हजर झाले. लंबूच्या खांद्यावर राजकुमार नि बुटक्या बसला. दगड राजकुमारच्या हातात होता. लंबू पोलाद महालाकडं चालत होता.

राजकुमार अस्वस्थ होता. त्यानं आणलेला दगड राजकुमारी असेलच कशावरून ? तो नुसता दगडच ठरला तर ? आपल्याला लोखंड झाल्याशिवाय गत्यंतर उरणार नाही.

ते पोलादमहालात आले. दारात सचिंत पोलादम् दिसला. त्याची, राजकुमारची आणि दगडाची गाठ पडताच पोलादम्च्या कमरेचा दुसरा पोलादी पट्टा निखळला. गळून आपोआप खाली पडला. तशी दगडातून राजकुमारी रूपमती प्रगट झाली. तिनं राजकुमारच्या खांद्यावर मान टाकली. ती नि राजकुमार पोला-दम्कडं पहात होते.

पोलादम् असहाय्य संतापानं काळाठिक्कर पडला होता. तरीही आवेशानं राजकुमारवर चालून आला. रूपमतीचा हात धरला. ओढला. म्हणाला, "अजून काय झालंय ? एक रात्र शिल्लक आहे. नाही तुझ्यावर लोखंड बनून पाण्यापावसात झिजण्याची पाळी आणणार तर मला नावाचा पोलादम् म्हणू नकोस, धवल-कुमार–" तणतणच तो राजकुमारीला घेऊन नाहीसा झाला.

राजकुमार, लंबू व बुटक्या विश्रांतीसाठी आपल्या दालनाकडं निघून गेले.

## ७. खाडीत पाचू पडला !

याखेपी राजकुमारी रूपमती काचेच्या पेटीत होती. पेटी लांब व रुंद होती. अख्खा माणूस झोपू शकेल एवढी. पेटीच्या काचेला जिथं जिथं जोड येत तिथं तिथं चकचकीत लोखंडी नाजुक कुलूप होतं किल्ली राजकुमारपाशी होती.

परंतु या खेपी राजकुमार डोळयांत तेल घालून पहाऱ्याचं काम करीत नव्हता. आपण कितीही काळजी घेतली तरी राजकुमारी पळवली जातेच. हा त्याला दोनदा अनुभव होता. त्यामुळं पहारा सुरू होताच त्यानं दालनाला कुलूप लावलं. बाहेर पडला. लंबू नि बुटक्या झोपले नव्हते. सावध होते. कालच्या किचकट अनुभवामुळं आज अधिक किचकट अनुभवाशी सामना आहे याची त्यांना जाणीव होती. पोलादम् राजकुमारीला कुठं नि किती लांब नेऊन टाकील याचा नेम नव्हता. त्यानं वाढून ठेवलेल्या आपत्तील सामोरी जाणं भाग होतं. रात्रीतूनच सारं व्हायला हवं होतं. निस्तरायला हवं होतं. नाहीतर दोन प्रयत्न फुकट गेले असते. शिवाय पुतळे होऊन झिजत रहावं लागलं असतं ते वेगळंच. सारे कसे डोळयांत तेल घालून होते.

लंबू आणि बुटक्या यांच्या दालनात राजकुमार आला तेव्हा बुटक्या आपल्या पलंगावर पद्मासन घालून बसला होता. पूर्वेकडं तोंड होतं. हात जोडले होते. डोळे मिटले होते. आल्या-आल्या राजकुमार म्हणाला, " बुटक्या-" पण त्याचं लक्ष ध्यानस्थ बुटक्यावर गेलं. शब्द तोंडात विरले.

त्यापूर्वीच लंबूनं राजकुमारकडं हात उंचावला. मोठी माणसं बोलत असताना लहान मूल बोललं म्हणजे माणसं काढतात तसे डोळे काढले. तोंडावर बोट उभं केलं. आवाज काढला. ' शूऽऽऽक !-"

राजकुमारनं पाहिलं. कधी नव्हे तो लंबू या घटकी गंभीर होता. पालखट मारून बसला होता. बुटक्याकडं पाहात होता.

बुटक्या बोलत होता, " आला-आला ! पोलादम् आला. तो पाहा त्यानं मंत्र म्हणणं सुरू केलं. पहा-पहा. राजकुमारी अदृश्य होत चालली. हवेत विलीन झाली. पेटीबाहेर पडली. असहाय्यपणे पोलादम्कडे चालू लागली. ती रडते आहे. स्फुंदते आहे. अरे अरे ! पोलादम्च्या पायासुद्धा पडते. ' वाचवा वाचवा ! ' म्हणते. बापरे ! पोलादम् काय क्रूर आहे ! त्यानं तिला लाथ मारली. पडली बिचारी. अरेरे ! तरी पाया पडतेय. आता पोलादम्नं अंगठी काढली. तीत पाचू आहे. त्यानं तो दातानं फोडला. थुंकला. अरे ? हे काय ? राजकुमारी पाचू बनली. आता हा काय करतोय ? पोलादम्नं राजकुमारीचा पाचू अंगठीत ठेवलाय. आता ही अंगठी तो बोटात घालणार काय ? नाही. तसं दिसत नाही. अंगठी हातातच ठेवून पोलादम् पोलाद महालाच्या पायऱ्या चढतोय. पहिला मजला. दुसरा मजला...सातवा... दहावा आता

तो मनोऱ्यावर आलाय. अंगठी मुठीतच आहे. काय करतोय ! हं–हं–हं–! अवती–भवती बघतोय. बरोबर आहे. कुणी पहायला नको. त्यानं अंगठीची मूठ ओठापाशी आणली. खातो की काय लेकाचा ? नाही. मंत्र पुटपुटतोय झालं. हात उगारलाय. शक्ती एकवटली. आँ ? अंगठी फेकली की हो लेकानं. ती पहा, ती चालली. पूर्वेकडं. सारखी चालत आहे. वळली. दक्षिणेकडं पण उडत आहेच. कशी तिरासारखी धावत सुटलीय. अरे–अरे ही जाणार तरी कुठं ? पुढं तर समुद्र आहे. सागरात तर नाही पडणार ? दिसतंय तसंच. नाही. अंगठी पडण्याच्या बेतात आली. पडते–पडते–पडते ! पडली–"

"कुठं ?" आतापर्यंत आतुरतेनं ऐकत असलेल्या राजकुमारानं विचारलं, "समुद्रात ?"

"नाही." बुटक्या म्हणाला, "खाडीत."

"खाडीत ?" राजकुमारच्या अंगावर भयाचा काटा उभा झाला.

"म्हणजे झालं, अंगठीसाठी हुडकण्याच्या दृष्टीनं समुद्र काय आणि खाडी काय ?"

"होय." चिंताग्रस्त स्वरात लंबू म्हणाला, "निघू या का ?"

"कुठं बुटक्या हताशपणे म्हणाला, "खाडीतली अंगठी शोधणं म्हणजे तुला डोंगरावरचा दगड शोधणं वाटतंय रे ? तुझ्याच्यानं तोही शोधून झाला नव्हता. आणि आता म्हणतोस खाडीकडं निघू या का ?"

"तुला नाही चलायचं ?" लंबूनं विचारलं.

"नाही-" खाडीत जाऊन जीव द्यायचा की काय ?" बुटक्यानं राजकुमारकडं पाहून सवाल केला.

राजकुमार बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हता.

लंबू बेफिकीर दिसत होता. तो बुटक्याला चेष्टेनं म्हणाला, " खाडीत जाऊन मरायचं नसेल तर इथं समाधी घ्यायला तयार हो. काहो राजकुमार ?"

" होय." राजकुमारला अवसान आलं. " आता कुठं ना कुठं मरण्याची पाळी ही आलीच. तेव्हा खाडीत बुडून मेलं काय नि इथं लोखंडी पुतळे होऊन मेलं काय दोनही सारखंच ! त्यापेक्षा खाडीकडं जाऊन काय प्रयत्न करता येतो की काय ते पहावं–"

" माझंही म्हणणं तेच–" लंबू म्हणाला. उठला. मग राजकुमारला म्हणाला, " चला महाराज, बुटक्या नसेल येत तर त्याला राहू द्या. आपण तर येणार-"

लंबू आणि राजकुमार जायला निघाले. बुटक्या चुळबुळला. तो इथं एकटा काय करणार होता ?

त्याला मनातून वाटलं की, कुठल्याही परिस्थितीत या महालातून बाहेर पडावं. अंगठीचा शोध लागला नाही तर परस्पर पसार होता येईल. लंबूनं दोघांना खांद्यावर बसवलं. मोठमोठ्या ढेंगा टाकत तो खाडीकडं चालू लागला. याखेपी लंबूच्या ढेंगा फारच मोठ्या होत्या. त्यानं पोलाद महालातून उचललेला पाय एकदम पोलाद नगराबाहेरील डोंगरात ठेवला. त्यामुळं पाचव्या की सहाव्या ढेंगेत तो खाडीपाशी पोचला.

या प्रकारानं राजकुमार थक्क झाला तर नवल नव्हतं. पण बुटक्याही चकीत झाला होता. कारण लंबूचा एवढा मोठा आकार त्यानं जन्मात पाहिला नव्हता. तो कदाचित बुटक्याला दाखवण्याची लंबूला कधी गरजच पडली नसल्यानं असेल.

ते खाडीपाशी आले. इंजिनिअर करतात तशी खाडीची पहाणी करू लागले. बुटक्यानं सांगितलं. अंगठी अगदी खाडीच्या मधोमध पडलीय्. त्या ठिकाणी आठ ते दहा पुरुष पाणी आहे, रेती आहे, गाळ आहे. अंगठी सापडणं कठीण आहे.

तरीही लंबू आणि राजकुमारनं खाडीची पहाणी केलीच. समुद्राच्या तोंडावर खाडी निमुळती झाली होती. जमिनीत मात्र ती चांगलीच पसरली होती. पहाणी आटोपली. लंबूनं मनाशी विचार केला, ' ज्या ठिकाणी खाडीचा मध्यभाग जमिनीला अगदी जवळ येत होता, त्या ठिकाणी तो खाडीकडं तोंड करून उभा होता. ओणवा झाला. फक्त हातांनी पाणी चाचपडत पाण्यात शिरू लागला. पाणी जितकं खोल जायचं तितके त्याचे हात लांबायचे. जमिनीपासून तो जितका पुढं जायचा तितकं शरीर लांबायचं. शरीर पाण्याच्या पृष्ठ भागाला कधीही लागायचं नाही. या पद्धतीनं तो सुमारे सहा फर्लांग लांब झाला. अंगठी पडली होती तिथपर्यंत पोचला. मग अंगठी चाचपू लागला.

चार-सहा क्षण गेले. लंबूच्या हाताला अंगठीचा मागमूस लागेना. लागणार तरी कसा ? खाडीत गाळ होता, दगड होते. घाण होती. गारगोटचा होत्या. शंख होते. शिपलेही होते. मासे होते. खेकडे होते. अशा असंख्य वस्तू आणि पाण्याचा तो एक मोठा संग्रह होता. त्यात कुठंतरी अंगठी असेलही. लंबूच्या तळव्यांना ती हजारदा लागलीही असेल. गाळाबरोबर हातात आलीही असेल. पण लंबूला जाणवेल कशी? त्याचा तळवा अजस्त्र ! एवढचा पसाऱ्यात त्याला केवळ स्पर्शज्ञानानं अंगठीइतकी नाजूक वस्तू ओळखणं कठीण जात होतं. वाटलं, आपण बुटक्याला

 ४...

कानापाशी बसवलं असतं तर बरं झालं असतं. ही संधी अजू होती. लंबूनं डोकं चालवलं. मान वळवली. खाडीच्या ज्या कडेला त्याचे पाय होते त्या कडेला राजकुमार आणि बुटक्या डोक्यावर हात ठेवून बसले होते. लंबूनं आवाज दिला, 'बुटक्या ऽऽ रे ! इकडं ये ऽऽ रे'

बुटक्याला ऐकू आलं. तिकडं जाण्याची त्याची हिंमत नव्हती. पण तसं सांगणं शक्य नव्हतं. लंबूला ऐकायला गेलं नसतं. लंबूसारख्या हाका मारीत होता. तेव्हा राजकुमार म्हणाला, "आपल्याला लंबू बोलावतोय असं वाटतंय–"

"वाटतं काय ? नक्कीच. पण जायचं कसं ?"

राजकुमारचा विचार झाला होता, "आपण लंबूच्या पाठीवरून जाऊ या–"

"मला चढता येत नाही–" खरं तर बुटक्याला भीती वाटत होती.

"मी चढवून देतो–" अन् बुटक्या काही बोलण्यापूर्वी राजकुमारनं त्याला उचललं. लंबूच्या पाठीवर ठेवलं. नंतर पोटरीवर पाय ठेवून राजकुमार स्वतः चढला. अरुंद पुलावरून चालावं तसे ते दोघंही लंबूच्या पाठीवरून चालू लागले. पहिल्यांदा बुटक्या खूप भीत होता. लहान मुलासारखा रांगत रांगत चालत होता. पण राजकुमारनं त्याचा हात धरला. बळेच उभं केलं. जेमतेम चालत मूल चालावं तसा तो चालू लागला. ते लंबूच्या कमरेवर आले. तिथं वाट अरुंद होती. राजकुमार आणि बुटक्या ह्यांना हातात हात घालून चालणं शक्य नव्हतं. राजकुमारनं बुटक्याला पुढं केलं. मग तो गेला. कारण बुटक्या मागच्यामागं

पडू नये याची भीती होती. नंतर ऐसपैस वाट होती. लंबूच्या बरगडचा तेवढया पायांना रुतत होत्या. हा त्रास तीनेक फर्लांग-भर झाला. अखेर ते लंबूच्या खांद्याशी आले. पाण्यात पाय सोडले. खांद्यावर बसले. लंबू म्हणाला, " हं, मी गाळात हात घालतोय. आता सांग अंगठी कुठं आहे ती–" लंबूनं गाळ ढवळणं सुरू केलं.

बुटक्या सांगू लागला. " डावीकडं. आणखी डावीकडं. थोडं पुढं. आणखी थोडं पुढं. अरे रे! फार झालं किंचित् मागं. किंचित् उजवीकडं हां! तिथंच, पण खाली आहे. तू मघा गाळ ढवळला तेव्हा ती दबलीय. खुपस हात. उकर–उकर. हां–हां' तिथंच–तिथंच! करंगळीकडचा गाळ घे, गाढवा ती करंगळी आहे रे! हां तिकडचा. घे...गाळ हातात. घे चांगला गाडीभर गाळ हातात! आली रे–आली रे–आली हातात! अरे–अरे, पडते–पडते–पडली–"

असं चार तास झालं. लंबू जेरीस आला. स्वाभाविक होतं. आधीच चालण्यानं नि नंतर पाण्यावर ओणवं राहिल्यानं लंबू थकला. म्हणाला, " आपण तर थकलो बुवा! थोडी विश्रांती घेऊ या, तुम्ही उतरा खांद्यावरून–"

बुटक्या टुणकन् उभा राहिला. घाई करून म्हणाला, " थांब–थांब! आम्हाला कडेला जाऊ दे. नाहीतर पाडशील पाण्यात–" नि तो रांगत रांगत चालूही लागला.

पण लंबू चांगलाच अवघडला होता. त्याला धीर धरवला नाही. तो तिथल्या तिथं ताठ होऊ लागला तसा बुटक्या मागं फिरला. कारण पाठीवर धरून ठेवण्यासारखं काहीच नव्हतं

खांद्याशी कसंबसं लोंबकळता आलं असतं. राजकुमार खांद्यावरच होता. लंबू अखडत अखडत किनाऱ्याला टेकला. बसला; पण त्यानं हात आखडले नाहीत. कारण गाळानं ते ओंगळ झाले होते. काही क्षण तसेच वाळवण्याचा त्याचा बेत होता. त्यामुळं गुडघ्यावर उभे केलेले हात खाडीवर मोठमोठे गळ टाकल्यासारखे लांबसडक दिसत होते.

दोनचार घटका ते निवांतपणे बसून राहिले. काय नि कसं करावं याचा विचार करीत होते. एकीकडं मृत्यूचं भय होतं. दुसरीकडं अंगठीची काळजी होती. राजकुमारला स्वतःचा पश्चात्ताप वाटत होता. आपण उगाच नसत्या आपत्तीत पडलोय असं वाटत होतं. त्याच्यासाठी खस्ता खाणाऱ्या लंबू आणि बुटक्याबद्दल राजपुत्राला अधिक वाईट वाटत होतं.

तेवढ्यात लंबूचा विचार झाला. त्यानं चुटकी वाजवली. उत्साहानं उसळी मारून म्हणाला, "जमतं हो सरकार, जमतंच."

"कसं ?" राजकुमारनं विचारलं.

एव्हाना लंबू वाटेनं लागला, एवढंच म्हणाला, "तुम्ही फक्त गंमत बघा–"

पाहाता–पाहाता तो समुद्राकडं आला. तिथं खाडी अतिशय निमुळती होती. तरी दोन एक फर्लांग रुंद असेल. लंबूनं उडी घेतली. खाडीच्या एकीकडं डोकं लावलं. दुसरीकडं पाय लावले. पाहाता पाहाता एवढा मोठा झाला की, समुद्राचं पाणी खाडीत येणं बंद झालं. लाटा त्याच्या कुशीवर आदळू लागल्या. चवताळून मागं फिरू लागल्या. मग खाडीतील पाण्याचा प्रश्न उरलाच. त्यावरही



BVBK-0400242

लंबूपाशी उपाय होता. नाकाचं एक भोक त्यानं खाडीतील पाण्याला लावलं. पाणी आत ओढू लागला. दुसऱ्या भोकानं ते समुद्रात सोडू लागला. चांगली हत्ती इतक्या जाडीशी नि चार पुरुष उंचीची धार बेदमपणे समुद्रात कोसळत होती. बुटक्या नि राजकुमार पहातच राहिले.



पहाटेच्या सुमारास खाडीतील माती उघडी पडली. पाण्यावाचून मासे तडपडू लागले. खेकडे आदी जलचर पाण्याच्या शोधार्थ डबक्याकडं धावू लागले. शंख–शिपल्या स्पष्ट दिसू लागल्या.

एवढं झाल्यावर राजकुमार आणि बुटक्या नेमकी अंगठी होती त्या ठिकाणी आले. बुटक्यानं जागा दाखविली. राजकुमारनं गाळ चाचपला. दोन–चार क्षणात त्याच्या हाताला अंगठीच लागली. हर्षोत्फुल्ल होऊन दोघंही खाडीबाहेर पडले. आनंदवार्ता लंबूला सांगितली. लंबूनं नाकावाटे पाणी हापसण्याचं काम बंद [illegible] आडव्याचा उभा झाला. तशी समुद्राची एक खवळलेली

लाट पुन्हा खाडी झाकून बसली. कोना–कोपऱ्यात फुटली जणू ती आनंदाचीच लाट होती. राजकुमार, लंबू आणि बुटक्या यांच्या अगाध शौर्याचं तुषार उडवून स्वागत करीत होता. हर्षं व्यक्त करीत होता.

नंतर राजकुमार लंबू आणि बुटक्या यांनी क्षणाचाही विलंब लावला नाही. कारण सूर्य उगवण्याच्या बेतात होता. तो दिसण्याच्या आत पोलादम्‌ला अंगठी दाखवायला हवी होती. लंबूनं राजपुत्र आणि बुटक्याला खांद्यावर बसवलं. खाडीवरून एक पाय उचलला तो थेट पोलाद महालात ठेवला.

पोलादम्‌ला राजकुमार दिसतो न दिसतो तर त्याच्या कमरेचा शेवटचा पट्टा निखळून पडला. त्याचक्षणी पोलादम्‌च्या छातीच्या चिधड्या झाल्या. अंगठीतून रूपमती प्रगट झाली. कृतज्ञतेने ती राजकुमारच्या खांद्यावर डोकं ठेवू लागली. लंबू–बुटक्याला आनंद आवरेनासा झाला. त्यांनी राजकुमारला स्नेहभरानं मिठ्या मारल्या